मराठवाडा विकास महामंडळ मर्यादित,

(महाराष्ट्र शासनाचा अंगीकृत उपक्रम)

नोंदणीकृत कार्यालय : विकास भवन, डॉ. राजेन्द्र प्रसाद मार्ग,
छत्रपती संभाजीनगर – ४३१००१

---

५८ वा वार्षिक अहवाल – २०२४-२०२५

MARATHWADA DEVELOPMENT CORPORATION LIMITED
(A Govt. Of Maharashtra Undertaking)
CINU74999MH1967SGCO13808

58th ANNUAL REPORT – 2024-2025

Registered Office
Vikas Bhavan, Dr. Rajendra Prasad Road,
Chatrapati Sambhajinagar – 431 001

मराठवाडा विकास महामंडळ मर्यादित,
(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)

५८ वा वार्षिक अहवाल
२०२४-२०२५

लेखा परिक्षक
मेसर्स कैलास ॲन्ड असोसिएटस
सनदी लेखापाल, छत्रपती संभाजीनगर

सीआयएनयु 74999एमएच1967एसजीसीओ13808

नोंदणीकृत कार्यालय
विकास भवन,
डॉ. राजेन्द्र प्रसाद मार्ग,
छत्रपती संभाजीनगर 431 001

(III)

मराठवाडा विकास महामंडळ मर्यादित
छत्रपती संभाजीनगर
५८ वा वार्षिक अहवाल २०२४-२०२५ अनुक्रमणिका

अ.क्र	तपशील	पान क्रमांक
01.	संचालक मंडळ	V
02.	भागधारकांना नोटीस	VII
03.	संचालकांचा अहवाल	१
04.	लेखापरिक्षकांचा अहवाल	५
05.	ताळेबंद	२१
06.	नफातोटा पत्रक	२३
07.	टिपा	३३
08.	लेख्यावरील टिपणी	३७
09.	भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षकांचा आढावा व अभिप्राय	४३

दुय्यम कंपन्याचे वार्षिक अहवाल
(ताळेबंद, नफातोटा पत्रक आणि भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचे अभिप्राय)

अ.क्र.	तपशील	अहवाल वर्ष	पान क्रमांक
01.	मराठवाडा चर्मोद्योग महामंडळ मर्यादित	२०२४-२०२५	४५-५०
02.	मराठवाडा दुग्ध विकास महामंडळ मर्यादित	२०२४-२०२५	५१-५६
03.	परभणी कृषी गो-संवर्धन मर्यादित	२०२४-२०२५	५७-६२
04.	मराठवाडा सिरॅमिक कॉम्प्लेक्स मर्यादित	२०२४-२०२५	६३-६८
05.	किनवट रुफिंग टाईल्स मर्यादित	२०२४-२०२५	६९-७६
06.	एलोरा मिल्क प्रॉडक्टस मर्यादित	२०२४-२०२५	७७-८४
07.	गोदावरी गारमेन्टस मर्यादित	२०२४-२०२५	८५-९२

(V)

मराठवाडा विकास महामंडळ मर्यादित

नोंदणीकृत कार्यालय: विकास भवन, डॉ. राजेन्द्र प्रसाद मार्ग, छत्रपती संभाजीनगर – 431 001

संचालक मंडळ – २०२४-२०२५

श्री. बा.त्रिं.यशवंते	:	व्यवस्थापकीय संचालक
श्री. चेतन आ. गिरासे	:	संचालक
श्रीमती करुणा वि. खरात	:	संचालिका

बॅन्कर्स

स्टेट बॅन्क ऑफ इंडिया शाखा क्रांती चौक, छत्रपती संभाजीनगर

पंजाब नॅशनल बॅन्क, शाखा अदालत रोड, छत्रपती संभाजीनगर

(VII)

मराठवाडा विकास महामंडळ मर्यादित

(महाराष्ट्र शासन अंगीकृत)

नोंदणीकृत कार्यालय: विकास भवन, डॉ. राजेन्द्र प्रसाद मार्ग, छत्रपती संभाजीनगर – 431 001

भागधारकांना नोटीस

याव्दारे अशी नोटीस देण्यांत येत आहे की, महामंडळाची ५८ वी वार्षिक सर्व साधारण सभा दिनांक २९ सप्टेंबर २०२५ रोजी घेण्यात आली होती. भारताचे नियंत्रक आणि महालेखापरिक्षक यांचे अभिप्राय येईपर्यन्त वर्ष २०२४-२०२५ च्या लेख्यास स्विकृती देणे बाबतचा विषय या सभेत तहकुब ठेवण्यात आला होता. महामंडळास भारताचे नियंत्रक आणि महालेखापरिक्षक यांचे महामंडळाच्या वर्ष २०२४-२०२५ च्या लेख्यावर निरंक टिपणी प्रमाणपत्र प्रधान महालेखाकार (लेखा परिक्षा)--II मुंबई या कार्यालयाकडून पत्र क्रमांक मले/लेप-II/मुंबई शाखा/टेक्नीकल सेल/मराठवाडा/(stand)२०२४-२५/११४४/३५६, दिनांक ११/१२/२०२५ प्रमाणे प्राप्त झालेले आहे.

याव्दारे नोटीस देण्यात येत आहे की, मराठवाडा विकास महामंडळ मर्यादित छत्रपती संभाजीनगरची (५८) वी तहकुब वार्षिक सर्व साधारण सभा दिनांक १०/०६/२०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता महामंडळाचे नोंदणीकृत कार्यालय, विकास भवन, डॉ. राजेन्द्र प्रसाद मार्ग, छत्रपती संभाजीनगर येथे खालील कामकाजाकरीता घेण्यात येईल.

सर्वसाधारण कामकाज

दिनांक ३१ मार्च २०२५ रोजी संपलेल्या लेखा परिक्षित नफातोटयाचा हिशोब आणि त्या तारखे पर्यन्तच्या ताळेबंद व यावरील संचालक मंडळाचा व लेखा परिक्षकांचा अहवाल तसेच भारताचे नियंत्रक आणि महालेखापरिक्षक यांचे निरंक टिपणी प्रमाणपत्र स्विकारणे ते विचारात घेणे व मान्य करणे.

यासोबत वार्षिक लेखे, संचालक मंडळ अहवालासह भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचे ३१/०३/२०२५ वर्षाअखेरच्या लेख्यावर प्रधान महालेखाकार (लेखापरिक्षा)-II मुंबई या कार्यालयाकडून पत्र क्रमांक ११४४/३५६ दिनांक ११/१२/२०२५ प्रमाणे प्राप्त झालेले निरंक टिपणी प्रमाणपत्र याची प्रत पाठवित आहोत.

संचालक मंडळाच्या वतीने व करीता

स्वाक्षरीत/-
(स्वप्निल.र.राठोड)
व्यवस्थापकीय संचालक

टीप:- मत देण्याकरीता उपस्थित राहण्याचा हक्क असलेल्या सदस्यास आपल्या ऐवजी उपस्थित राहण्यासाठी व मत देण्यासाठी प्रतिनिधी नियुक्ती करण्याचा हक्क आहे. असा प्रतिनिधी महामंडळाचा सदस्य असणे आवश्यक नाही.

जा.क्र.मविम/तह.वासस/२०२४-२५/२३/२०२६ दिनांक १४/०५/२०२६

मराठवाडा विकास महामंडळ मर्यादित

नोंदणीकृत कार्यालय : विकास भवन, डॉ. राजेंद्र प्रसाद मार्ग, छत्रपती संभाजीनगर – ४३१००१

संचालकांचा अहवाल

प्रति,
मा. भागधारक,
मराठवाडा विकास महामंडळ मर्यादित,
छत्रपती संभाजीनगर

३१ मार्च २०२५ रोजी संपलेल्या सन २०२४-२०२६ या वर्षाच्या परिक्षित वार्षिक लेख्यासह ५८ वा वार्षिक अहवाल आपले संचालक मंडळ आपल्यापुढे सादर करीत आहे. महामंडळाचे अधिकृत भागभांडवल रुपये १२००.०० लक्ष चे असुन भरणा झालेले भांडवल रु. १०१६.९४ लक्ष आहे. महामंडळास यावर्षी रु. ५८.५७ लक्षाचा नफा झाला आहे जो की, मागील वर्षी रुपये २१.४७ लक्ष नफा झाला होता.

आकडे लक्ष रुपयात

	चालू वर्ष	**मागील वर्ष**
घसा-याकरीता तरतुद	१.५४	१.८०
वर्षात झालेला नफा (तोटा)	५८.५७	२१.४७
एकुण संचित तोटा	(-४५२.२७)	(-१०११.४०)

चालु आर्थिक वर्षात अपेक्षीत नफ्याच्या लेखी आयकराची तरतुद करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र शासनाकडे व इतर विभागाकडे वर्षभरात पाठविणे असलेले विविध विषयातील विवरणे २०२४-२०२५ या वर्षात पाठविण्यात आली आहेत. महाराष्ट्र शासनाच्या निर्देशाप्रमाणे प्रशासकीय खर्चात व इतर खर्चात कांही मर्यादेपर्यन्त कपात करण्यात आली आणि प्रशासकीय वरकड खर्च व कार्यालय परिरक्षण यावरील खर्चात शक्य तेवढया मर्यादेपर्यन्त काटकसरी बाबतची उपाय योजना अनुसरण्यात आली.

प्रकल्प अधिकारी एकात्मिक विकास प्रकल्प कळमनुरी जिल्हा हिंगोली यांच्या मागणीनुसार महाराष्ट्र शासन आदिवासी विभाग यांना त्यांच्या परभणी शहरात मुलांसाठी व मुलींसाठी वसतीगृहाच्या इमारतीसाठी त्यांच्या आवश्यकतेनुसार ५ हेक्टर ११ आर जमीन आदिवासी विकास विभागाच्या शासन निर्णय क्र.बीयुडी-२०२३-प्र.क्र.२ कार्यासन दिनांक ०८/०१/२०२४ आणि आकाई १४२२/ प्र.क्र. २०५/ का ०५ दि १५/०२/२०२४ नुसार महामंडळाची दुय्यम कंपनी परभणी कृषी गो-संवर्धन म.ची जमीन विकत घेण्यासाठी विचारात घेतल्याप्रमाणे रु १३१९९४०००/- मुल्यामधील मविमला शासनास देय असलेल्या कर्ज रकमेपोटी रु १०५२४०१२०/- जमा केली आणि उर्वरित रक्कम रु. २६७५३८८०/- मविम च्या भारतीय स्टेट बँक खात्यात प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय कळमनुरी यांनी भांडवली मिळकत कर भरण्याकरिता दि ३१/०३/२०२४ रोजी वर्ग केली आहे. या संदर्भात उद्योग,उर्जा कामगार आणि खनिकर्म विभागाने प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कळमनुरी जिल्हा हिंगोली यांना ५ हेक्टर व ११ आर जमीन हस्तांतरित करण्यासाठी दि १६/०३/२०२४शासन निर्णय निर्गमित केलेला आहे. प्रत्यक्ष जमिनीचा ताबा प्रकल्प अधिकारी एकात्मिक विकास प्रकल्प कळमनुरी जि.हिंगोली यांना ५ हेक्टर ११ आर जमीन दिनांक २९/०१/२०२५ रोजी दिलेला आहे.

(1) लघु औद्योगिक वसाहती : अंबड जिल्हा जालना:

महामंडळाचे कार्य जवळपास बंद झालेले आहे, नगर परिषद, अंबड यांचेकडून लघु औद्योगिक वसाहत विकसीत करण्यासाठी मिळालेल्या जमिनीवर महामंडळाने गाळयाचे बांधकाम केले व उर्वरीत जागेवर भुखंड तयार केले. उद्योजकांचे प्रकरणे विचारात घेऊन लघु औद्योगिक वसाहत जशी आहे तशी जिल्हाधिकारी जालना, नगर परिषद, अंबड यांना पुढे परत करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. उद्योजकाच्या प्रकरणाबाबत महामंडळ लघु औद्योगिक वसाहतीबाबत सद्यस्थितीची माहिती घेत आहे.

बीज भांडवल वसूली:

मराठवाडा विभागातील जिल्हा उद्योग केन्द्राकडून प्राप्त झालेल्या माहितीप्रमाणे बीजभांडवल कर्ज वसुली निरंक आहे.

(2) महामंडळाचे स्वत:चे प्रकल्प / दुय्यम कंपन्या :

दिनांक ३१/०३/२०२५ अखेर दुय्यम कंपन्याची माहिती खालील प्रमाणे आहे.

(रुपये लाखात)

अ.क्र.	दुय्यम कंपनीचे नांव	अधिकृत भागभांडवल	भरणा झालेले भागभांडवल	संचित तोटा (लाखात)
०१.	गोदावरी गारमेन्टस, मर्यादित छत्रपती संभाजीनगर	१००.०० लक्ष	२४.०० लक्ष	८२४.४७
०२.	एलोरा मिल्क प्रॉडक्टस मर्यादित छत्रपती संभाजीनगर	१५.०० लक्ष	०५.०० लक्ष	१५३.४६
०३.	किनवट रुफिंग टाईल्स मर्यादित छत्रपती संभाजीनगर	२५.०० लक्ष	१९.०० लक्ष	१२१.६६
०४.	मराठवाडा सिरॅमिक कॉम्प्लेक्स मर्यादित छत्रपती संभाजीनगर	१००.०० लक्ष	६८.०० लक्ष	७२३.२९
०५.	मराठवाडा चर्मोद्योग महामंडळ मर्यादित छत्रपती संभाजीनगर	१००.०० लक्ष	६३.५० लक्ष	६६६.९७
०६.	मराठवाडा दुग्ध विकास महामंडळ म. छत्रपती संभाजीनगर भागासाठी अर्ज रक्कम	२००.०० लक्ष	१८.०० लक्ष २०.०० लक्ष	३१३.१८
०७.	परभणी कृषी गो-संवर्धन मर्यादित छत्रपती संभाजीनगर मविम सहकारी गोरक्षण संस्था परभणी	२५.०० लक्ष	१९.०० लक्ष १४.०० लक्ष ०५.०० लक्ष	१०४५.१५ नफा

ब-याच वर्षापासुन वरील सर्व दुय्यम कंपन्यांचे कार्य बंद आहे. सर्व कर्मचा-यांनी कंपनीच्या सेवेतून स्वेच्छानिवृत्ती स्विकारलेली आहे.

कंपनी कायदा कलम 499 अन्वये परिसमापन:

आर्थिक वर्ष 2005-2006 पासुन सर्व अधिकारी आणि कर्मचारी यांनी स्वेच्छा निवृत्ती योजना स्विकारली आहे. महामंडळाच्या व **दुय्यम** कंपन्याच्या आस्थापनेवर एकही कर्मचारी नाही त्यामुळे 6 कंपन्यांचे कार्य ब-याच वर्षापासुन बंद आहे.

परंतु कायद्यानुसार वेगवेगळी विवरणे दरवर्षी वेगवेगळया कार्यालयाकडे सादर करावे लागतात त्यासाठी महामंडळ वर्षानुवर्ष खर्च करीत आहे म्हणून महामंडळाने महाराष्ट्र शासनाच्या उद्योग उर्जा व कामगार विभागाकडे **दुय्यम** कंपन्यावर अवसायक नियुक्त करुन अथवा व्यावसाईक ठराव घेऊन दुय्यम कंपन्या मराठवाडा विकास महामंडळ मर्यादित ने महाराष्ट्र शासनाच्या उद्योग उर्जा कामगार व खनिकर्म विभागास मराठवाडा विकास महामंडळाने हयातील अडचणी विचारात घेवुन १) **मराठवाडा दुग्ध विकास महामंडळ मर्यादित** छत्रपती संभाजीनगर २) **मराठवाडा चर्मोद्योग महामंडळ मर्यादित** छत्रपती संभाजीनगर ३) **किनवट रुफिंग टाईल्स मर्यादित** छत्रपती संभाजीनगर ४) गोदावरी गारमेन्टस, मर्यादित छत्रपती संभाजीनगर ५) **मराठवाडा सिरॅमिक कॉम्प्लेक्स मर्यादित** छत्रपती संभाजीनगर ६) **एलोरा मिल्क प्रॉडक्टस मर्यादित** छत्रपती संभाजीनगर या दुय्यम कंपन्या मराठवाडा विकास महामंडळ या सूत्रधार कंपनीत विलीन करण्यास परवानगी देण्याकरिता नवीन प्रस्ताव महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, उर्जा , कामगार व खनिकर्म विभाग यांच्या कडे दि १०/०६/२०२४ सादर केलेला असून या सदर्भाने कक्ष अधिकारी उद्योग -१० उद्योग, उर्जा व कामगार व खणीकर्म विभागाने त्यांचे पत्र दि २०/०५/२०२५ अन्वये परभणी कृषी गो-संवर्धन म.बाबत कायदेशीर मत घेऊन सुधारित विलीन करण्याचा प्रस्ताव द्यावा असे कळविले यासाठी महामंडळ कायदेशीर मत घेत आहे मत प्राप्त झाल्यानंतर नियोजित कृती महामंडळ हाती घेईल .

3) दुय्यम कंपन्याचे जमा आणि खर्च:

मराठवाडा विकास महामंडळाच्या संचालक मंडळाने ठराव क्रमांक ३२८५ दिनांक २०/०९/२००७ अन्वये निर्णय घेतल्याप्रमाणे चालू आर्थिक वर्षात (०६) दुय्यम कंपन्या करीता केलेला सर्व खर्च रुपये २७६.१४ लक्ष महामंडळाच्या नफातोटा खात्यात खर्ची टाकण्यात आलेला आहे व संचालक मंडळ ठराव क्रमांक ३४९६ दिनांक ०९/०३/२०१२ अन्वये परभणी कृषी गो-संवर्धन मर्यादित करीता करण्यात येणारे खर्च / उत्पन्न त्या कंपनीच्या लेख्यात दर्शविण्यात येत आहेत व महामंडळाकडून परभणी कृषी गो-संवर्धन मर्यादितच्या नांवे व जमा दाखविण्यात येत आहेत, त्याप्रमाणे चालू आर्थिक वर्षात या कंपनीस रुपये ०३.७२ लक्ष नावे टाकलेला आहे आणि प्राप्ती मध्ये पकृगो कंपनीच्या आयकर परताव्याचे व्याज ०.०१ लक्ष रक्कम पुस्तकी घेतली असून कंपनीच्या कर्ज आणि अग्रीम खात्यात जमा केली आहे.

4) **संचालक मंडळ**

वार्षिक सर्वसाधारण सभेत श्रीमती करुणा वि. खरात यांची संचालक पदी पुनर्नियुक्ती करण्यात आली. सन २०२४-२०२५ या वर्षासाठी महामंडळाचे संचालक मंडळ खालील प्रमाणे आहे.

अ.क्र.	संचालकाचे नांव	पद
०१	श्री. बी.त्रिं. यशवंते	उद्योग सहसंचालक छत्रपती संभाजीनगर ०५/०६/२०२३ पासून
02	श्री. चेतन आ. गिरासे	प्रादेशिक अधिकारी महाराष्ट्र औद्योगिक विकास म.छत्रपती संभाजीनगर
03	श्रीमती करुणा वि. खरात	अधिक्षकीय उद्योग अधिकारी उद्योग संचालनालय महाराष्ट्र शासन मुंबई - ३२

5) कंपनी कायदा १९५६च्या अधिनियमांचे कलम २१७(२अे) अनुसार कंपनीचा तपशील:

दरसाल रुपये २४.०० लक्ष किंवा दरमहा रुपये २,००,०००/- वेतन चालु वर्षात घेतलेले कर्मचारी नाहीत.

६) **लेखा परिक्षक व कंपनी विधी विषयक बाबी:**

०१. वरीष्ठ प्रशासकिय अधिकारी, भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक कार्यालय, नवी दिल्ली, यांनी सन २०२४-२०२५ वर्षासाठी मेसर्स कैलास ॲन्ड असोसिएटस, सनदी लेखापाल, छत्रपती संभाजीनगर यांची लेखा परिक्षक म्हणून त्यांचे पत्र दिनांक २१/०९/२०२५ अन्वये नियूक्ती केली आहे. या संस्थेने लेखा परिक्षण पुर्ण केले आहे व त्यांचा लेखा परिक्षण अहवाल संचालक मंडळासमोर ठेवण्यात आलेला आहे.

०२. **मविम करीता कंपनी सचिव यांची नेमणूक:**

महामंडळ तोट्यात असल्यामूळे महामंडळाकरीता स्वतंत्र कंपनी सचिव यांची नेमणूक करणे शक्य नसल्यामूळे महामंडळाने कंत्राटी पध्दतीने कंपनी सचिव सल्लागार यांची नेमणूक केलेली आहे.

०३. **ठेवी / कर्ज / अग्रीम:** कोणत्याही प्रकारच्या ठेवी / कर्जाऊ / अग्रीम रकमा नाहीत.

७) **संचालकांच्या जबाबदारीचे विवरण:**

कंपनी कायदा २०१३ च्या कलम १३४ नुसार संचालकांच्या जबाबदारीचे विवेचन खालील प्रमाणे करण्यांत येत आहे.

१) दिनांक ३१मार्च २०२५ रोजी संपणा-या आर्थिक वर्षाचे लेखे तयार करीत असतांना लेख्याचे मानांकन वापरण्यात आले असून त्यासोबत संबंधीत योग्य तो खुलासा देण्यात आलेला आहे.

२) संचालकांनी अंतीम लेखे करीत असतांना सत्य व खरा दृष्टीकोन ठेऊन धोरण आखले जेणे करुन महामंडळाच्या वित्तीय वर्षाच्या शेवटचे चित्र स्पष्ट होते आणि महामंडळाचा चालु वर्षातील तोटा पडताळणी अंतर्गत आहे.

३)संचालकांनी अंतीम लेखे करीत असतांना कंपनी कायदा 2013 च्या तरतुदीनुसार योग्य व पुरेशी काळजी घेतली जेणे करुन घोटाळा अथवा गैर प्रकार टाळता आला.

४) ३१ मार्च २०२५ रोजी संपणा-या आर्थिक वर्षाचे लेखे चालु व्यवसायाच्या तत्वावर संचालकांनी तयार केले आहेत.

८) **ऋणनिर्देश:**

महाराष्ट्र शासनाने महामंडळाच्या कार्याबद्दल आस्था दाखविली त्याबद्दल संचालक मंडळ कृतज्ञता व्यक्त करीत आहे. तसेच मा. प्रधान सचिव (उद्योग), सहसचिव (उद्योग) व विकास आयुक्त (उद्योग) महाराष्ट्र शासन कक्ष अधिकारी उद्योग-10 यांचेही संचालक मंडळ ऋणी आहे.मा.संचालक वैद्यकीय शिक्षण व औषधशास्त्र निर्माण विभाग महाराष्ट्र शासन, मा.जिल्हाधिकारी परभणी,मा.अतिरिक्त सचिव आदिवासी विभाग महाराष्ट्र शासन वित्तीय संस्था, राष्ट्रीयकृत बॅन्का, उद्योग सह संचालक छत्रपती संभाजीनगर विभाग, विभागातील जिल्हा उद्योग केन्द्राचे महाव्यवस्थापक यांनी केलेल्या आवश्यक त्या सहकार्या बद्दल संचालक मंडळ कृतज्ञता व्यक्त करीत आहे. महामंडळाचे अधिकारी / कर्मचारी यांनी केलेल्या मौलिक सेवेबद्दल संचालक मंडळ समाधान व्यक्त करीत आहे.

संचालक मंडळ यांच्या करीता व त्यांच्या वतीने

स्वाक्षरीत/-

(बा. त्रिं. यशवंते)

व्यवस्थापकीय संचालक

स्थळ: छत्रपती संभाजीनगर

दिनांक: १०/०९/२०२५

के.एम. अग्रवाल.बीकॉम, एलएल.बी. (GEN), FCA
अकीत के. अग्रवाल
B. Com, FCA, M.Sc. ACCT & FIN [LSE, UK)
सलोनी अग्रवाल
B. Com FCA
विधी एस ब्रिजवासी
B. Com ACA

कैलाश आणि असोसिएट्स
सनदी लेखापाल
७. अग्रवाल हाऊस, बन्सीलाल नगर.
स्टेशन रोड, छ.संभाजीनगर
431 005(0240): 233 88 11. 233 25 26
E-Mailkailashandassociates@gmail.com
website:www.kailashassociates.com

लेखापरीक्षकाचा स्वतंत्र अहवाल

मराठवाडा विकास महामंडळाच्या सभासदास
स्वतंत्र आर्थिक विवरणांचा अहवाल
अंकेक्षण पात्र मत

आम्ही मे. मराठवाडा विकास महामंडळ मर्यादित महाराष्ट्र शासनाचा उपक्रम कंपनी च्या दिनांक ३१ मार्च २०२५ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचा ताळेबंद, नफा तोटा पत्रक आणि त्या वर्ष अखेर प्राप्त कॅश फ्लो आणि वित्तीय पत्रकांचे सारांश आणि स्पष्टीकरणात्मक माहितीसह वित्तीय विवरण पत्राचे तक्के, विवरण पत्र व सारांश या अहवालासंदर्भात आम्ही लेखा परिक्षण केले आहे.

आमच्या मते आणि आम्हास उपलब्ध करुन दिलेल्या माहितीनुसार व आम्हाला दिलेल्या स्पष्टीकरणानुसार, आमच्या अहवालातील पात्रतेच्या आधारावर विभागातील वर्णन केलेल्या प्रकरणांवरील पात्र मत वगळता, भारतात स्विकारल्या जाणा-या लेखा तत्वाच्या अनुपालनात वरील वित्तीय विधाने एक खरा आणि योग्य दृष्टीकोन देतात.

०१. महामंडळाच्या दिनांक ३१ मार्च २०२५ अखेर पर्यन्तच्या घडामोडी ताळेबंदात दाखविण्यात आल्या आहेत.

०२. दिनांक ३१ मार्च २०२५ अखेर संपणा-या वर्षासाठी नफा दाखविण्यात आला आहे.

०३. दिनांक ३१ मार्च २०२५ अखेर संपणा-या वर्षासाठीचा रोख प्रवाह दाखविण्यात आला आहे.

अहर्ताप्राप्त मतासाठी आधार:

कंपनीच्या अभिलेख्यावरुन असे दिसुन येते की, भारताचे नियंत्रक आणि महालेखा परिक्षक यांनी वेळोवेळी आणि गतवर्षी जारी केलेल्या लेखा परिक्षण अहवालाकडे व्यवस्थापनाने पुरेसे लक्ष दिलेले नाही.

०१. महाराष्ट्र शासनाकडून घेण्यात आलेल्या कर्जाबाबत कोणतेही विवरणपत्र, पुष्टीकरण व परतफेड कालावधी याबाबतची माहिती कंपनीने आम्हास दिलेली नाही. कंपनीने पुनरावलोकनांतर्गत आणि मागील वर्षामध्ये दिलेल्या कर्जावर व्याजाची नोंद घेतलेली नाही. ही थकबाकी फार पूर्वीपासुनची आहे. त्यानुसार ती खरोखरच देय आहे की नाही याबद्दल आम्ही टिपणी करण्यास असमर्थ आहोत. जर प्रत्यक्षात ते देय नसतील तर उत्तरदायित्वापेक्षा जास्त आणि त्या प्रमाणात उत्पन्नाच्या विवरण पत्रावर त्याचा परिणाम होतो.

०२. कंपनीचे कामकाज ब-याच कालावधीपासुन थांबले आहे. कंपनीत कोणतेही कर्मचारी नाहीत. कायदेविषयक सल्ला घेतल्यानंतर महाराष्ट्र शासनाने असे कळविले आहे की, कंपनी कायदा 1956 च्या कलम 499 नुसार मराठवाडा विकास महामंडळ मर्यादित अंतर्गत सर्व दुय्यम कंपन्या परिसमापीत करण्याची प्रक्रिया अवलंबवावी.

०३. कंपनीच्या वर्तमान मालमत्ता आणि दायीत्वे मध्ये परावर्तीत होणारी जुनी शिल्लक निर्लेखित केलेली नाही . जरी ती प्राप्त योग्य नसली तरी

०४. कंपनी तिच्या उपकंपन्याचा खर्च उचलत आहे जसे की लेखा परीक्षका चे मानधन कारण तिच्या उपकंपन्या परभणी कृषी गो-संवर्धन म. शिवाय कार्यरत नाहीत त्यामुळे नफा कमी दर्शविला जातो.

०५. कंपन्याना दिलेले कर्ज व अग्रीम रक्कमा हया जुळवलेल्या नाहीत या थकीत रकमावर येणा-या व्याजाची तरतूद केलेली नाही. ज्यामुळे मालमत्तेचे वर्णन कमी दाखल गेले आहे आणि उत्पन्नाच्या विवरणात त्या प्रमाणात तडजोड केली गेली.

०६. भाडेकरू सोबत झालेल्या करारानुसार थकीत भाडे रक्कम उत्पन्न रु ३३०३०५/-कंपनीने दर्शविली असुन त्यावरील वस्तू सेवाकरातून तरतूद केली नाही . त्यामुळे वस्तू कराच्या कायद्याच्या कलम १३ अन्वये वेळेच्या मुदतीप्रमाणे वस्तू कराचे दायित्वे येऊ शकते.

०७. कंपनीने घसारा हा कंपनी कायदा 2013 च्या तरतुदी नुसार न आकारता आयकर कायदा १९६१ अन्वये आकारला आहे.

०८. त्यांच्या काराच्या कमतरते मुळे त्याचा परिणाम मोजता येत नाही जरी ती देय नसली तरी

०९. सरकारी प्रिंटींग प्रेस, पीडब्लूडी या इमारतीच्या दुरुस्तीआणि दैनिक संघर्ष वृत्तपत्राला देय असलेल्या जुन्याचालू देयकेमध्ये दाखवलेली रक्कम बराच काळ भरली गेली नाही ती निर्लेखित करावी.

१०. **दुय्यम** कंपन्याना देण्यात येणारी कर्जे आणि अग्रीमे आणि भाग भांडवलावर प्राप्त व्याज आणि व यंत्रमाग संस्था आणि सहकारी संस्था ज्यांची संपत्ती आधीच कमी झालेली आहे. या संदर्भात महालेखाकार यांनी आपल्या लेखी पत्राव्दारे वेळोवेळी भाष्य केले आहे आणि गतवर्षीच्या लेखा परिक्षकांच्या अहवालात सुध्दा बुडीत कर्ज व संशयास्पद ऋणासाठी योग्य तरतुद / पुर्नप्राप्ती न झाल्याचे नमुद करण्यात आले आहे. कंपनीच्या व्यवस्थापनाने गमावलेली / निर्लेखित केलेली गुंतवणूक ओळखली नाही आणि त्यासाठी आजपर्यन्त तरतुदही केलेली नाही. त्यानुसार त्याचा परिणाम म्हणुन कंपनीची मत्ता जास्त दिसुन संबंधित खर्च तेवढयाने कमी दिसतो त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

अ.क्र.	तपशील	रक्कम रुपये
1.	दिर्घ मुदतीची कर्जे व अग्रीम	३३६२२७६९२.००
2.	अमुर्त चालू गुंतवणूक	९०३३५७४५.००
3.	उपरोक्त गुंतवणूकीवरील उपार्जित व्याज	३१२४१७११.००
	ए कु ण	४५७८०५१०८

उपरोक्त नमुद बाबी किंवा स्थिती कंपनीच्या अस्तित्वाबाबत / चालु असण्याबाबत अनिश्चीतता दर्शवितात. जी कंपनीची सतत चिंता वाढविणारी असुन कंपनीच्या, कंपनी चालू असलेल्या क्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करु शकतात.

तथापी, कंपनीची एकत्रित वित्तीय पत्रके कंपनी चालू आहे या आधारावर तयार केली आहेत. वित्तीय पत्रके (या अहवालात नमुद करण्यात आल्याप्रमाणे) आणि त्या बाबतचा टिपणी ही वस्तूस्थिती उघड करत नाहीत.

आर्थिक विवरणपत्रे आणि लेखापरीक्षकाच्या अहवालाव्यतिरिक्त इतर माहिती

इतर माहिती (माहिती किंवा इतर शिर्षक योग्य असेल ते, जसे की, वित्तीय पत्रके आणि लेखा परिक्षकांच्या अहवालाव्यतिरीक्त इतर माहिती आणि त्यावरील लेखा परिक्षकांचा अहवाल).

कंपनीचे संचालक मंडळ इतर माहिती देण्यासाठी जबाबदार असते. इतर माहितीमध्ये वार्षिक अहवालात समाविष्ट असलेली माहिती समाविष्ट आहे. परन्तू त्यात वित्तीय विधाने आणि त्यावरील लेखा परिक्षकांचा अहवाल समाविष्ट नाही.

एकत्रित आर्थिक विधानाबद्यलच्या आमच्या मतामध्ये इतर माहितीचा समावेश नाही आणि आम्ही त्यावर कोणत्याही प्रकारचे खात्री आणि निर्णय घेऊ शकत नाहीत.

एकत्रित केलेल्या आर्थिक तक्त्याच्या आमच्या लेखा परिक्षणासंदर्भात इतर माहिती बाबत जबाबदारी आमची आहे आणि असे करताना, इतर माहिती आर्थिक विवरणाशी किंवा लेखापरिक्षणात प्राप्त झालेल्या आमच्या ज्ञानाशी भौतिकरित्या विसंगत आहे की नाही याचा विचार करण्यात येतो किंवा अन्यथा त्या भौतिक चुकीच्या नसल्याचे दिसुन आले. आम्ही केलेल्या कार्याच्या आधारे, आम्ही असा निष्कर्ष काढतो की, इतर भौतिक माहिती चुकीची आहे. आम्हाला त्या तत्वाबद्यल अहवाल देणे आवश्यक आहे. आमच्याकडे या संदर्भात अहवाल देण्यासारखे कांही नाही.

स्वतंत्र एकत्रित वित्तीय विवरणपत्रांसाठी व्यवस्थापनाची जबाबदारी व प्रशासनासह एकत्रिकरणाच्या तयारी संदर्भात आकारणा-या जबाबदा-या

कंपनीचे संचालक मंडळ कंपनी कायदा 2013 (कायदा) च्या कलम 134(5) मध्ये नमुद केलेल्या बाबीसाठी जबाबदार आहे. वित्तीय विवरणपत्रे जी व्यवहार स्थिती (आर्थिक स्थिती) नफा किंवा तोटा (आर्थिक कामगिरी), कंपनीच्या कॅश फलो मधील बदल सामान्यत: भारतात स्विकारल्या गेलेल्या लेखा तत्वानुसार, विशिष्ट लेखा मानदंडासह, कंपनीच्या कॅश फलोमध्ये बदल घडवून आणतात, कायद्याच्या कलम 133 अंतर्गतच्या जबाबदा-यामध्ये कंपनीच्या मालमत्तेचे रक्षण करण्यासाठी तसेच फसवणूक आणि इतर अनियमितता रोखण्यासाठी व कायद्याच्या तरतुदीनुसार पुरेसे लेखा अभिलेखाची देखभाल करणे देखील समाविष्ट आहे. योग्य लेखा धोरणांची निवड आणि अंमलबजावणी, वाजवी विवेकपूर्ण निर्णय आणि अनुमान काढणे, आणि लेखा अभिलेखाची अचुकता आणि संपूर्णत: सुनिश्चीत करण्यासाठी प्रभावीपणे कार्य करणा-या, वास्तविक आणि योग्य दृष्टीकोनातुन देणारी आणि आर्थिक चुकीची माहिती देणा-या आर्थिक तक्त्यांच्या सादरीकरणाशी संबंधीत, पुरेशी अंतर्गत आर्थिक डिझाईन, अंमलबजावणी आणि देखभाल, फसवणूक किंवा त्रुटीमुळे आहे.

एकत्रित वित्तीय तक्ते तयार करतांना, संचालक मंडळ जबाबदार असेल आणि कंपनीची पुढे चालु ठेवण्याची पात्रता तपासण्यासाठी, जाहीर करण्यासाठी, लागु करण्यासाठी, कंपनीची क्षमता मुल्यांकन करण्यासाठी जबाबदार असेल. कंपनीला या अनुषंगाने चालू किंवा बंद करण्याची जबाबदारी, वित्तीय लेखे तयार करणे तसेच कंपनीला पुढे चालू ठेवण्याची पात्रता तपासणे या संदर्भात माहिती उघड करणे या अनुषंगाने कंपनी विसर्जित करणे किंवा कंपनी बंद करणे या बाबीवर संचालक मंडळाचा दृष्टीकोन सत्य भासत नाही

आर्थिक पत्रके तयार करतांना, संचालक मंडळाचा हेतू नसल्यास, संचालक मंडळाची चिंता करण्याजोगी चिंता करणे, उघड करणे, लागू झाल्यास, काळजी घेणे आणि लेख्याच्या चालू असलेल्या चिंताच्या आधाराचा उपयोग करणे या कंपनीची क्षमता मुल्यांकन करण्यासाठी जबाबदार आहे.

संचालक मंडळ हे देखील कंपनीच्या आर्थिक अहवाल प्रक्रियेवर देखरेख ठेवण्यास जबाबदार आहे.

आर्थिक तक्त्यांच्या लेखा परिक्षणासाठी लेखा परिक्षकांची जबाबदारी:

आर्थिक विवरणपत्राच्या लेखापरीक्षणासाठी लेखा परीक्षकाच्या जबाबादा-या

आमच्या लेखा परिक्षणाचा उद्देष आर्थिक तक्ते फसवणूक किंवा त्रुटीमुळे महत्वाच्या चुकांपासुन मुक्त असावेत अशी सर्वसाधारण खात्री ही उच्च पातळीवरची खात्री आहे. याचा अर्थ असा नाही की, लेखा परिक्षणाच्या निर्धारीत तत्वानुसार केलेले लेखा परिक्षणातुन महत्वाच्या चुका सापडतील असे नाही. आर्थिक तक्त्यासंबंधी चुकीची विधाने ही फसवणूक तसेच त्रुटीमुळे होतात अशा त्रुटी / चुकामुळे वैयक्तीरित्या किंवा कंपनीच्या आर्थिक निर्णयावर परिणाम होतात. लेखा परिक्षणाच्या मानकांनुसार लेखा परिक्षणाचा एक भाग म्हणून आम्ही व्यावसाईक निवाडा करतो आणि लेखा परिक्षणामध्ये व्यावसाईक साशंकता ठेवतो.

- आर्थिक घोटाळयामुंळे किंवा चुकीच्या त्रुटीमुळे, त्या जोखमीस जबाबदार लेखा परिक्षण प्रक्रियेची आखणी व अंमलबजावणी करणे असो किंवा आर्थिक मतांच्या चुकीच्या माहितीच्या जोखमीचे मुल्यांकन करणे आणि आमच्या मताला आधार देण्यासाठी पुरेसे व योग्य असे लेखा परिक्षण विषयक पुरावे मिळवतो. फसवणूकीमुळे उदभवणा-या भौतिक चुकीच्या माहितीचा शोध न घेण्याचा धोका चुकांमुळे उदभवणापेक्षा जास्त असतो. कारण फसवणूकीमध्ये एकत्रीकरण, बनावटपणा, हेतुपुरस्सर चुक, चुकीचे भाष्य करणे किंवा अंतर्गत नियंत्रण समाविष्ट असु शकते.

- परिस्थितीत योग्य असलेल्या लेखा परिक्षण प्रक्रियेची रचना करण्यासाठी लेखा परिक्षणाशी संबंधीत अंतर्गत नियंत्रणाची माहिती प्राप्त करणे, कंपनी कायदा, 2013 च्या कलम 143(3)(i) अंतर्गत कंपनीकडे योग्य अशी अंतर्गत वित्तीय नियंत्रण प्रणाली आहे की नाही आणि अशा नियंत्रणाची कार्यक्षमता प्रभावी आहे की नाही यावर आमचे मत व्यक्त करण्यासही आम्ही जबाबदार आहोत.

- वापरलेल्या लेखा धोरणांची योग्यता आणि व्यवस्थापनाव्दारे केलेल्या लेखा अंदाजाचे आणि संबंधीत प्रक्टीकरणाच्या वाजवीपणाचे मुल्यांकन करणे.

- कंपनी चालु ठेवण्यासाठी उपयुक्तता संपूष्टात आणण्यासाठी प्राप्त लेखा पुरव्याच्या आधारे अनिश्चीत घटना तसेच प्राप्त परिस्थितीच्या आधारे कंपनी बंद करणे कंपनीच्या व्यवस्थापनास योग्य ठरेल. जर आम्ही असा निष्कर्ष काढला की एखादी भौतिक अनिश्चीतता अस्तित्वात आहे, तर आमच्या आर्थिक लेख्यावरील संबंधीत बाबीकडे आमच्या

लेखा परिक्षकांच्या अहवालावर लक्ष वेधले पाहिजे किंवा असे कांही खुलासे अपुरे पडल्यास आपले मत सुधारीत करावे. आमचे निष्कर्ष आमच्या लेखा परिक्षणाच्या अहवालाच्या तारखेपर्यन्त प्राप्त केलेल्या लेखा परिक्षणाच्या पुराव्यावर आधारीत आहेत. तथापी, भविष्यातील घटना किंवा परिस्थितीमुळे कंपनी चिंताजनक म्हणून चालू ठेवण्यास कारणीभुत ठरु शकते.

- प्रकटीकरणासह वित्तीय विवरणाची संपूर्ण सादरीकरण, रचना आणि सामग्रीचे मुल्यांकन करणे आणि वित्तीय विवरणपत्राचे योग्य प्रकारे सादरीकरण प्राप्त करण्याच्या मार्गाने मुलभुत व्यवहार आणि कार्यक्रमांचे प्रतिनिधीत्व करण्यात येते काय ?

- आम्ही आमच्या लेखा परिक्षणादरम्यान ओळखल्या जाणा-या अंतर्गत नियंत्रणातील कोणत्याही महत्वपूर्ण कमतरतांसह अन्य गोष्टीबरोबरच लेखा परिक्षपणाची नियोजीत व्याप्ती आणि लेखा परिक्षणाच्या लक्षणीय निष्कर्षाविषयी, प्रशासनासह शुल्क आकारलेल्या लोकांशी आम्ही संवाद साधतो.

आम्ही संबंधीत स्वतंत्र नैतिक आवश्यकतांचे पालन केले आहे असे निवेदन देऊन आणि त्यांच्याशी सर्व संबंध आणि आमच्या स्वातंत्र्यावर वाजवी विचार करता येतील अशा इतर बाबीची संवाद साधण्यासाठी आणि जेथे लागू असेल तेथे संबंधीत उपयुक्त बाबीसुध्दा आम्ही नमुद केल्या आहेत.

आम्हास असे वाटते की आम्हाला मिळालेली ऑडिट पुरावे स्टॅड अलोन आर्थिक विवरणावरील आमच्या पात्र ऑडीट पत्राला आधार देण्यासाठी पुरेसे आणि योग्य आहेत.

इतर कायदेशीर आणि निमायक आवश्यकतां बाबतचा तपशील:

०१. कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १४३ च्या पोटकलम (११) च्या अनुषंगाने भारत सरकारने जारी केलेल्या कंपन्यांचा (लेखा परिक्षकांचा अहवाल) आदेश २०२० (ऑर्डर) व्दारे परिच्छेद ३ आणि ४ मध्ये निर्दिष्ट बाबीवर लागू असलेल्या मर्यादेपर्यन्त आवश्यक असलेली माहिती आम्ही परिशिष्टात दिली आहे.

०२ सदर कायद्याच्या कलम १४३(३) मध्ये नमुद केल्यानुसार, आम्ही अहवाल देत आहोत की,

अ. अहर्ताप्राप्त लेखा परिक्षण मताआधारे वर्णन केलेल्या प्रकरणांच्या संभाव्य प्रभावाशिवाय, लेखा परिक्षणाच्या हेतुने आवश्यक असलेली सर्वोत्तम माहिती आणि खुलासे आम्ही प्राप्त केले असुन त्या अनुषंगाने आम्ही सर्व माहिती शोधली आणि प्राप्त केली आहे.

ब. अहर्ताप्राप्त लेखा परिक्षण मताआधारे वर्णन केलेल्या प्रकरणांच्या संभाव्य प्रभावाशिवाय, आमच्या मते कायद्यानुसार आवश्यक असणारी लेखाविषयक पुस्तके कंपनीव्दारा ठेवली गेली असल्याचे सदर पुस्तकांच्या आमच्या परिक्षणावरुन दिसते.

क अहर्ताप्राप्त लेखा परिक्षण मताआधारे वर्णन केलेल्या प्रकरणांच्या संभाव्य प्रभावाशिवाय, या अहवालाव्दारे हाताळलेला एकत्रित ताळेबंद, नफा आणि तोटा एकत्रित विवरणपत्रके आणि एकत्रित कॅशफलो स्टेटमेन्ट या खात्यांच्या पुस्तकाशी मिळते जुळते आहेत.

ड. अहर्ताप्राप्त लेखा परिक्षण मताआधारे वर्णन केलेल्या प्रकरणांच्या संभाव्य प्रभावाशिवाय, आमच्या मते, उपरोक्त एकत्रित आर्थिक विवरणपत्रक कंपनी कायदा, २०१४ च्या नियम क्रमांक ०७ सह कायद्याच्या कलम १३३ अंतर्गत नमुद केलेल्या लेखा मानदंडांचे पालन करते. उत्पन्नावरील करासाठी अे एस २२ लेखा वगळता

ई. ही शासकीय कंपनी असल्याने कंपनी कायद्याच्या कलम १६४(२) मधील तरतुदी तिला लागू नाहीत. त्यामुळे हे कलम लागू होत नाही.

एफ. सहकारी वित्तीय अहवालावरील अंतर्गत वित्तीय नियंत्रणाच्या संदर्भात आणि अशा नियंत्रणाची अंमलबजावणीची कार्यक्षमता परिशिष्ट क मधील स्वतंत्र अहवालात नमुद करण्यात आली आहे आणि

जी. सदर कायद्याच्या कलम १९७(१६) च्या आवश्यकतेनुसार लेखा परिक्षकांच्या अहवालात समाविष्ट केलेल्या इतर बाबी संदर्भात ही एक सरकारी कंपनी असल्याने अधिनियमाच्या कलम १९७ मधील तरतुदी लागू होत नाहीत.

एच. आमच्या मते आणि आमच्या उत्कृष्ट माहितीनुसार आणि आम्हाला दिलेल्या स्पष्टीकरणानुसार कंपनी (लेखा परिक्षक आणि लेखा परीक्षण) नियम २०१४ मधील नियम क्रमांक ११ नुसार इतर बाबीच्या संदर्भात लेखा परिक्षण अहवालात नमुद केले आहे.

०१. आम्हास व्यवस्थापनाने प्रलंबीत खटल्यांचा तपशील निरंक आहे असे सांगितले आहे.

०२ .आम्हाला देण्यात आलेल्या माहितीच्या आणि स्पष्टीकरणाच्या आधारे कंपनीव्दारे कोणतेही दिर्घकालीन करार करण्यात आले नव्हते ज्याव्दारे कंपनीच्या मालमत्तेस हानी पोहोचेल.

०३. आम्हाला देण्यात आलेल्या माहितीच्या आणि स्पष्टीकरणाच्या आधारे कंपनीकडे अशी कोणतीही रक्कम नाही जी कंपनी कायदा, 2013 आणि त्या अंतर्गत तयार केलेल्या नियमांच्या संबंधित तरतुदीनुसार गुंतवणूकदार शिक्षण आणि संरक्षण निधीमध्ये हस्तांतरीत करण्याची आवश्यकता आहे.

०४.

अ. व्यवस्थापनाने असे प्रतिनिधित्व केले आहे की त्यांच्या उत्तम ज्ञान आणि विश्वासाप्रमाणे कोणताही निधी (जे वैयक्तिकरित्या किंवा एकूण सामग्री आहेत) प्रगत किंवा कर्ज दिलेले किंवा गुंतवलेले नाहीत एकतर उधार घेतलेल्या निधीतून किंवा भाग प्राधान्य किंवा इतर कोणत्याही स्त्रोतातून किंवा कोणत्याही प्रकारचा निधी कंपनीकडून किंवा इतर कोणत्याही व्यक्तीने नोंदवलेले किंवा घटकाला परदेशी संस्था (मध्यस्थ) हे समजुन घेवुन, लेखी अथवा अन्यथा मध्यस्थ कंपनीने (अंतिम लाभार्थी किंवा त्यांच्या वतीने कोणत्याही प्रकारे ओळखले जाणा-या इतर व्यक्ती किंवा संस्थाना प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे कर्ज देतील किंवा गुंतवणुकन्क्रतील किंवा अंतिम लाभार्थीच्या वतीने कोणतीही हमी, सुरक्षा किंवा तत्सम प्रदान करेल.

ब. व्यवस्थापनाने प्रतिनिधीत्व केले आहे की, त्यांच्या ज्ञान आणि विश्वासाप्रमाणे परदेशी संस्था (निधी पक्ष) सह कोणत्याही व्यक्ती किंवा घटकाकडून कंपनीला निधी (जे वैयक्तिक रित्या किंवा एकूण सामग्रीत आहेत) प्राप्त झालेले नाहीत हे समजून घेवुन लिखित स्वरूपात किंवा अन्यथा नोंदवलेले असले तरी कंपनी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे कोणत्याही प्रकारे ओळखल्या गेलेला इतर व्यक्तींना संस्थाना कर्ज देईल किंवा गुंतवणूक करेल.निधी पक्ष (अंतिम लाभार्थी) च्या वतीने किंवा अंतिम लाभार्थीच्या वतीने कोणतीही हमी, सुरक्षा किंवा या सारखे प्रदान करणे.

क. लेखा परीक्षण प्रकीयेच्या आधारे त्यांना वाजवी आणि परिस्तिथी मध्ये योग्य मानले गेले आहे.असे काही आमच्या निदर्शनात आलेले नाही त्यामुळे वरील (अ) आणि (ब) अंतर्गत प्रदान केल्याप्रमाणे नियम ११ (ई) च्या उपखंड (i) आणि (ii) अंतर्गत सादरीकरणामध्ये कोणतेही भौतिक चुकीचे विधान आहे असा आम्हाला विश्वास आहे.

५. कंपनीने वर्षभरात कोणताही लाभांश जाहीर केलानाही किंवा दिला नाही.

६. आमच्या परीक्षणाच्या आधारावर ज्यामध्ये चाचणी तपासण्याचा समावेश होता. कंपनीने ३१ मार्च २०२५ वर्ष अखेर संपलेल्या आर्थिक वर्षा साठी खात्याची पुस्तके राखण्यासाठी अकाउंटिंग सॉफ्टवेअर वापरलेले नाही ज्यात तपासणी सूत्रे (एडीट लॉग) रेकॉर्ड करण्याची सुविधा नाही कारण कंपनी वापरत आहे पुस्तक ठेवण्याची हस्तलिखित प्रणाली.

३. आम्ही कायद्यातील कलम १४३(५) च्या निर्देशानुसार आणि परिशिष्ट-सी मध्ये भारताचे नियंत्रक आणि महालेखा परिक्षक यांनी जारी केलेले उपनिर्देशानुसार कंपनीच्या लेखा पुस्तकांच्या आणि अभिलेख्याच्या आधारे, आम्हाला योग्य वाटले आणि स्पष्टीकरण आणि आम्हाला दिलेल्या माहितीनुसार आमचा अहवाल संलग्न करीत आहोत

कैलाश आणि असोसिएट्स
सनदी लेखापाल
(फर्मची नोंदणी क्रमांक: १०४५० W)
स्वाक्षरीत
सीए. अंकित के. अग्रवाल पार्टनर
(सदस्यत्व क्रमांक: १४१७४२)
युडीन: २५१४१७४२ बीएमआयआय एम एक्स ७०७८
ठिकाण: छ. संभाजीनगर
तारीख: १०/०९/२०२५

परिशिष्ट – अ

मे. मराठवाडा विकास महामंडळ मर्यादित यांच्या दिनांक 31 मार्च 2025 अखेर संपलेल्या वित्तीय पत्रकाविषयी लेखा परिक्षकांचा अहवाल

कंपनीच्या एकत्रित आर्थिक विवरण पत्रावर ख-या व योग्य दृष्टीकोनाचा अहवाल देण्यासाठी आणि आम्हाला दिलेली माहिती आणि स्पष्टीकरण आणि लेखा परिक्षणाच्या सर्वसाधारण प्रक्रियेप्रमाणे आमचेव्दारे तपासणी केलेली खाती व इतर नोंदी लक्षात घेण्याच्या उद्येशाने लेखा परिक्षण प्रक्रियेच्या आधारे लेखा परिक्षण करुन त्याबद्यलचे मत आम्ही आमच्या योग्य माहिती व विश्वासाच्या आधारे नोंदवत आहोत ते असे की,

अ. कंपनीने गुणात्मक तपशील आणि मालमत्ता, प्रकल्प आणि साधन सामुग्रीची परिस्थिती यासह संपूर्ण तपशील दर्शविणारी योग्य ती नोंद ठेवली नाही.

ब. आम्हास दिलेल्या माहिती आणि खुलाशावरुन असे नमुद करतो की, व्यवस्थापनाने वर्षअखेर मालमत्ता, प्रकल्प आणि साधन सामुग्रीची प्रत्यक्ष तपासणी केलेली नाही म्हणून त्यावर भाष्य करण्यास आम्ही असमर्थ आहोत.

क. अचल मालमत्तेची कागदपत्रे (शिर्षक पत्रके) आम्हाला सत्यापनासाठी उपलब्ध करुन देण्यात आले नाहीत म्हणून अचल मालमत्ता कंपनीच्या नांवे आहे किंवा कसे याबाबत भाष्य करण्यास आम्ही असमर्थ आहोत.

ड. .कंपनीने तिची मालमत्ता वनस्पती किंवा उपकरणे किंवा अमूर्त मालमत्ता किंवा दोन्हीचे पुनमुल्यांकन केलेले नाही

ई. आम्हास सूचित करण्यात आले आहे की, बेनामी व्यवहार प्रतिबंध कायदा १९८८ आणि त्या खाली बविलेल्या त्या नियमानुसार कोणतीही बेनामी मालमत्ता ठेवल्याबद्दल कंपनी विरुद्ध कोणतीही कार्यवाही सुरु केलेली नाही किंवा प्रलंबित आहे.

II अ कंपनीने वर्षभरात माल विकत घेतला / विकला नाही किंवा कोणताही सुरुवातीचा किंवा शेवटचा साठा नसल्यामुळे, समभागाच्या फिजीकल व्हेरीफिकेशन किंवा इन्व्हेंटरी रेकॉर्डच्या देखरेखीवर अहवाल देण्याची गरज भासत नाही.

ब .वर्षभरात कंपनीने चालू मालमत्तेच्या सुरक्षतेच्या आधारावर बँक वित्तीय संस्था कडून ५ कोटी रुपया पेक्षा जास्त खेळत्या भांडवलाची मर्यादा मंजूर केलेली नाही त्यामुळे हे कलम लागू होत नाही.

III आम्हाला देण्यात आलेल्या माहिती व स्पष्टीकरणानुसार कंपनीने मागील वर्षात आपल्या 07 उपकंपनींना कर्ज मंजूर केले आहे. कर्ज देतांना कुठल्याही अटी व शर्ती नमुद केल्या नाहीत म्हणूनच कंपनीच्या हिताच्या दृष्टीने अटी व शर्ती प्राथमिक आहेत की नाही याबद्यल आम्ही भाष्य करु शकत नाही. कंपनीने वर्षभरात कर्ज मंजूर केलेले नाही. वर्षभरात कोणतेही कर्ज आणि ऍडव्हान्स दिलेले नसल्यामुळे किंवा कोणतीही गुंतवणूक केलेली नसल्यामुळे खंड (II) चे उपखंड अ ते एक लागत लागू नाही.

IV आमच्या मते आणि आम्हाला दिलेल्या माहितीनुसार आणि स्पष्टीकरणानुसार कंपनीचे कर्ज, गुंतवणूक, हमी आणि तारण यांच्या संदर्भात कंपनी कायदा **2013** च्या कलम **185** आणि **186** च्या तरतुदीचे पालन केले नाही.

V कंपनीने लोकांकडून कोणतीही ठेवी स्विकारलेल्या नाहीत. परिणामी ऑर्डरच्या परिच्छेद **3** च्या कलम **(v)** च्या आवश्यकता लागु नाहीत.

VI आमच्या मते आणि आम्हाला दिलेल्या माहितीनुसार व स्पष्टीकरणानुसार कंपनी कायदा **2013** च्या कलम **148(1)** अन्वये आवश्यक असलेल्या परिव्यय लेखा पुस्तके व माहिती ठेवण्याची कंपनीस आवश्यकता नाही.

VII अ. भारतात सामान्यत: स्विकारलेल्या लेखा तत्वानुसार केलेल्या लेखा पुस्तकांच्या तपासणीच्या वेळी आमच्याव्दारे पाहिल्या गेलेल्या, कंपनी सामान्यत: निर्विवाद वैधानिक थकबाकी योग्य अधिका-याकडे जमा करण्यास नियमीत राहीली आहे. त्यानुसार कोणतीही थकबाकी वैधानिक थकबाकी नाही. आर्थिक वर्षाच्या शेवटच्या दिवशी देय झालेल्या तारखेपासुन सहा महिन्यापेक्षा जास्त कालावधीसाठी कोणतीही खालील बाबी वगळता थकबाकी नाही.

1. पॉवरलुम विभागाची विक्रीकराची रक्कम रुपये ३१३८६२/- एवढी ब-याच काळापासुन बाकी आहे.

ब. आम्हाला देण्यात आलेल्या माहिती व स्पष्टीकरणाच्या आधारे व आमच्याव्दारे तपासणी केलेल्या कंपनीच्या नोंदीनुसार आयकर, संपत्तीकर, विक्रीकर, अबकारी शुल्क, सेवाकर, सीमाशुल्क, वस्तू व सेवाकर आणि कोणत्याही वस्तूवा कर नाही. मुल्यवर्धित कर याबाबत कोणत्याही प्रकारची थकबाकी नाही.

VIII आमच्या मते आम्हाला दिलेल्या माहिती नुसार आणि स्पष्टीकरणानुसार आयकर कायदा १९६१ अंतर्गत कर आकारणी दरम्यान समीक केलेली किंवा उत्पन्न म्हणून उघड केलेले खाते पुस्तकात कंपनीचे कोणतेही नोंद केलेले व्यवहार नाहीत.

अ. कंपनीने महाराष्ट्र शासनाकडून मागील अनेक वर्षापूर्वी कर्ज घेतले आहे. ज्याचा दिनांक ३१/०३/२०२५ अखेरचा तपशील खालील प्रमाणे आहे.

तपशील	रक्कम रुपये
महाराष्ट्र शासनाकडून व्याजमुक्त कर्ज	२०७८११६३७.००
महाराष्ट्र शासनाकडून बीज भांडवल कर्ज	१२९०३६५२३.००
महाराष्ट्र शासनाकडून लहान क्षेत्राचे कर्ज	४९८५०.००
महाराष्ट्र शासनाकडून आदिवासी क्षेत्राचे कर्ज	२५९३५.००
महाराष्ट्र शासनाचे टेक्सकॉमकरीता घेतलेले कर्ज	१३५४०००.००
महाराष्ट्र शासनाकडील व्याजमुक्त विक्री कर कर्ज	२२९८३१०.००
आजारी उद्योजकांना अर्थ सध्यासाठी कर्ज	३९०००.००
टेक्सकॉम कर्जासाठी महाराष्ट्र शासनास व्याज आकारणी आणि देय कर्ज	१३८३२७०१.००
मराठवाडा सिरॅमिक कॉम्प्लेक्सच्या कर्जावरील देय व्याज	१३२१८०४.००
सुशिक्षीत बेरोजगार योजना कर्ज वसुलीवर शासनाय देय व्याज	१५४३३६०५.००

तथापी कंपनीने आम्हाला कोणतेही परतफेड वेळापत्रक किंवा आमच्या पडताळणीसाठी कोणतेही विवरण दिलेली नाही म्हणुन वरील कर्जाच्या बाबतीत थकबाकी परतफेडीत कोणत्याही डिफॉल्टवर आम्ही भाष्य करू शकत नाहीत.

ब. आम्हाला दिलेल्या माहितीनुसार आणि स्पष्टीकरणानुसार कंपनीला कोणत्याही बँक किंवा वित्तीय संस्था किंवा इतर कर्ज दात्याद्वारे जाणून बुजून पैसे वेळेत न भरणारा म्हणून घोषित केले गेले नाही.

क. कंपनीने कोणतेही मुदत कर्ज उभारलेले नाही त्यामुळे निधी वळवण्याचा मुद्दा लागू होत नाही.

ड. वर्षभरात कोणताही निधी उभारला गेला नाही म्हणुन ती मुद्द लागू होत नाही.

इ. आम्हाला दिलेल्या माहितीनुसार आणि स्पष्टीकरणानुसार कंपनीने तिच्या उपकंपन्या,सहयोगी किंवा संयुक्त उपक्रमाच्या जबाबदा-या पूर्ण करण्यासाठी कोणत्याही घटकाकडून किंवा व्यक्तीकडून वर्षभरात कोणताही निधी घेतला नाही.

एफ. आम्हाला दिलेल्या माहितीनुसार आणि स्पष्टीकरणानुसार कंपनीने तीच्या उपकंपन्या संयुक्त उपक्रम किंवा सहयोगी कंपन्यामध्ये ठेवलेल्या रोख्याच्या तारणावर वर्षभरात कर्ज उभारली नाहीत.

X अ. आम्हास दिलेल्या माहितीनुसार आणि स्पष्टीकरणानुसार कंपनीने वर्षभरात प्रारंभिक सार्वजनिक देण्याची तयारी किंवा पुढील सार्वजनिक रुपयाची तयारी कोणताही मार्ग नाही (कर्ज साधनासहाद्वारे) पैसे उभे केलेले नाहीत त्यामुळे हे कलम लागू होत नाही.

ब. आम्हाला दिलेल्या माहितीनुसार आणि स्पष्टीकरणानुसार कंपनीने वर्षभरात समभाग किंवा परिवर्तनीय डीबेंचर पूर्णपणे, अंशत किंवा वैल्कल्पिकरित्या परिवर्तनीयाचे कोणतेही प्राधान्य वाटप किंवा खाजगी योग्य व्यक्तीस दिलेले नाही. ·

XI

अ. आमचे सर्वोत्तम ज्ञान आणि विश्वास आणि आम्हाला दिलेली माहिती आणि स्पष्टीकरणानुसार, कंपनी किंवा कंपनीकडून त्याचे अधिकारी किंवा कर्मचा-यांनी कोणतीही अफरातफर केल्याचे आमच्या लेखा परिक्षणाच्या कालावधीत आढळले नाही किंवा नोंदले गेलेले नाही.

ब. कंपनी कायद्याच्या कलम १४३ च्या उपकलम(१२) अंतर्गत कोणताही अहवाल कंपनी लेखापरीक्षा नियम २०१४ च्या नियम १३ अंतर्गत केंद्र सरकार कडे विहित केलेले फॉर्म ADT ४ मध्ये दाखल केलेला नाही.

क. व्यवस्थापनाने आम्हास सूचित केल्याप्रमाणे वर्षभरात कोणतेही धोकादर्शक तक्रारी कंपनीस मिळाल्या नाहीत.

XII कंपनी ही निधी कंपनी नाही. परिणामी ऑर्डरच्या परिच्छेद 3 च्या कलम (xii) च्या आवश्यकता लागू नाहीत.

XIII आम्हास दिलेल्या माहितीनुसार आणि स्पष्टीकरणानुसार लेखापरीक्षना लेखा मानले म्हणून आर्थिक विवरणात उघडलेले नाही म्हणून आम्ही कायद्याच्या १७७ आणि १८८ च्या अनुपालनावर टिपणी करत आहोत.

XIV अ. आमच्या मते आणि आमच्या परीक्षेच्या आधारे कंपनीकडे कोणतीही ऑडीट प्रणाली नाही.

ब. अंतर्गत लेखापरीक्षण प्रणाली नसल्याने हे कलम लागू होत नाही.

XV आम्हाला दिलेल्या माहिती आणि स्पष्टीकरणानुसार आणि कंपनीच्या रेकॉर्ड आधारित कंपनीने त्यांच्याशी जोडलेल्या लोकांशी नॉन कॅश व्यवहार केलेला नाहीत परिणामी आदेशाच्या परिच्छेद उच्चा खंड (XV) ची आवश्यकता लागू होत नाहीत.

XVI अ. कंपनीला भारतीय रिझर्व बँक कायदा १९३४ च्या कलम ४५ आयेनुसार नोंदणी करणे आवश्यक नाही.

ब. कंपनीने कोणतेही नॉन बँकिंग वित्तीय किंवा गृहनिर्माण वित्त विषयक उपक्रम केले नाहीत त्यामुळे या कलमा खाली अहवाल देणे लागू होत नाही.

क. भारतीय रिझर्व बँकेने केलेल्या नियमामध्ये परिभाषेत केल्यामुसार कंपनी ही महत्वाची गुंतवणूक कंपनी (सीआयसी) नाही.

ड. आमच्या मते आणि आम्हाला दिलेल्या माहितीनुसार आणि स्पष्टीकरणानुसार समूहात सीआयसी कंपन्या नाहीत त्यामुळे या कलमाखाली अहवाल देणे लागू होत नाही .

XVII आमच्या मते आणि आम्हाला दिलेल्या माहितीनुसार आणि स्पष्टीकरणानुसार कंपनीला आर्थिक वर्षात आणि तत्काळ आधीच्या आर्थिक वर्षात रोख तोटा होत नाही.

XVIII आमच्या मते आणि आम्हाला दिलेल्या माहिती नुसार आणि स्पष्टीकरणानुसार वर्षभरात वैधानिक लेखापरीक्षकांनी राजीनामा दिलेला नाही.त्यामुळे हे कायम लागू होत नाही.

XIX आर्थिक गुणोत्तर , वृद्धत्व आणि आर्थिक मालमतेची वसुली आणि आर्थिक दायीत्वे भरण्याच्या अपेक्षित तारखा व्यवस्थापनाने सादर केलेल्या वित्तीय विवरणासह इतर माहिती संचालक मंडळ आणि व्यवस्थापन योजनाचे आमचे ज्ञान या आधारावर आम्ही सक्षम नाही. लेखापरीक्षण अहवालाच्या तारखेपर्यंत कोणतीही भौतिक अनिश्चितता आहे किंवा नाही यावर भास्य करणे ही कंपनी ताळेबांदाच्या तारखेला अस्तित्वात असलेल्या दायित्वाची पूर्तता करण्यास सक्षम नाही आणि जेव्हा ते मुदतीत देय असतील तेव्हा ताळेबंद तारखेपासून एकवर्षाचा, कारण ज्या उपकंपन्यांना कंपनीने प्रगत कर्ज दिले आहेत त्यांच्या विषयी गृहीतके संशयास्पद आहे.

XX अ. चालू असलेल्या प्रकल्पा व्यतिरिक्त सीएसआर खर्च केलेला नाही त्यामुळे कलम लागू होत नाही.

ब. चालू असलेल्या प्रकल्पाच्या संदर्भात,सीएसआर खर्च केलेला नाही त्यामुळे हे कलम लागू नाही.

कैलाश आणि असोसिएट्स
सनदी लेखापाल
(फर्मची नोंदणी क्रमांक: १०४५० W)
स्वाक्षरीत
सीए. अंकित के. अग्रवाल पार्टनर
(सदस्यत्व क्रमांक: १४१७४२)
युडीन: २५१४१७४२ बीएमआयआय एम एक्स ७०७८ ठिकाण: छ. संभाजीनगर
तारीख: १०/०९/२०२५

के.एम. अग्रवाल.बीकॉम, एलएल.बी. (GEN), FCA
अकीत के. अग्रवाल
B. Com, FCA, M.Sc. ACCT & FIN [LSE, UK)
सलोनी अग्रवाल
B. Com FCA
विधी एस ब्रिजवासी
B. Com ACA

कैलाश आणि असोसिएट्स
सनदी लेखापाल
७. अग्रवाल हाऊस, बन्सीलाल नगर.
स्टेशन रोड, छ.संभाजीनगर
431 005(0240): 233 88 11. 233 25 26
E-Mailkailashandassociates@gmail.com
website:www.kailashassociates.com

परिशिष्ट क
मराठवाडा विकास महामंडळाच्या सभासदास
(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)
सीआयएन-यु ७४९९९एमएच १९६७ एसजीओ १३८०८
कंपनी कायदा २०१३ च्या कलम १४३ च्या उपकलम (५) अंतर्गत निर्देशित

प्र. १. आयटी प्रणालीद्वारे सर्व लेखा व्यवहारांवर प्रक्रिया करण्यासाठी कंपनीकडे यंत्रणा आहे का ? होय असल्यास, खात्यांच्या अखंडतेवर IT प्रणालीबाहेरील लेखा व्यवहारांच्या प्रक्रियेचे परिणाम आणि आर्थिक परिणाम, जर काही सांगितले असेल तर ते सांगितले जाऊ शकते.
उत्तर: सर्व लेखा व्यवहार रेकॉर्ड करण्यासाठी किंवा त्यावर प्रक्रिया करण्यासाठी कंपनीकडे IT प्रणाली नाही. सर्व आर्थिक व्यवहारांची नोंद करण्यासाठी कंपनी मॅन्युअल बुककीपिंग प्रक्रियेचे अनुसरण करते. आम्ही प्रणाली सत्यापित केली आहे आणि आम्हाला कोणतीही सामग्रीत विसंगती आढळली नाही.

प्र.२. कंपनीच्या कर्जाची परतफेड करण्यास कंपनीच्या अक्षमतेमुळे सध्याच्या कर्जाच्या पुनर्गठन किंवा कर्ज माफी /कर्ज/व्याज इ. प्रकरणे आहेत कारण जर होय असेल तर आर्थिक परिणाम सांगितले जाऊ शकतात अशा प्रकरणाचा योग्य हिशोब घेतला जातो की नाही अशा प्रकरणाची योग्यरित्या गणना केली जाते का
उत्तर: आम्हाला प्रदान केलेल्या माहिती आणि कागदपत्रांनुसार, कंपनीच्या सध्याच्या कोणत्याही कर्जाची पुनर्रचना झालेली नाही.

प्र 3. केंद्र/राज्य सरकार किंवा त्यांच्या एजन्सींकडून विशिष्ट योजनांसाठी मिळालेला/प्राप्त निधी (अनुदान/अनुदान इ.) त्याच्या अटी व शर्तींनुसार योग्यरित्या जमा/वापरण्यात आला होता का? विचलन प्रकरणांची यादी करा
उत्तर :लेखापरीक्षणाखालील वर्षात, कंपनीला कोणतेही अनुदान किंवा अनुदान मिळालेले नाही, त्यामुळे हा मुद्दा लागू होणार नाही

विभागीय विशीष्ट उप-निर्देश खालीलप्रमाणे आहेत:

प्र १. लेखापरीक्षण अहवालात नमूद केलेला नफा/तोटा कंपनीच्या नफा आणि तोटा विवरणानुसार आहे का?

उत्तर : होय नफा कंपनीच्या पुस्तकानुसार आहे

प्र २. कंपनी कायदा 2013 च्या अनुसूची III नुसार संशयास्पद कर्जासाठी तरतूद संबंधित शीर्षकांतर्गत स्वतंत्रपणे दर्शविली गेली आहे का आणि दीर्घ थकीत कर्जांसाठी योग्य तरतुदी केल्या आहेत का?

उत्तर : कंपनीने बुडीत किंवा संशयास्पद कर्जासाठी कोणतीही तरतूद केलेली नाही.

०३. 31 मार्चपूर्वी पूर्ण झालेल्या भांडवली कामांसाठी कंत्राटदाराला केलेल्या पेमेंटच्या सर्व खर्चाचे भांडवल हिशेबपुस्तकात करण्यात आले आहे का?

उत्तर : प्रारंभी किंवा वर्षभरात कोणतेही भांडवली काम प्रगतीपथावर नव्हते.

०४. व्यापारी येणे ,व्यापारी दायीत्वे व मुदत ठेवी, रोख आणि बँक शिलके यांच्या पुष्टीकरणावर टिप्पणी .

उत्तर: कंपनीकडे कोणतीही व्यापारी येणी शिल्लक नाहीत. मुदतठेवी साठी, व्यापारी देय शिल्लक पुष्टीकरण, रोख आणि बँक शिल्लक पृष्टीकारण प्राप्त आणि सत्यापित केला गेला आहे.

प्र.५. केंद्र/राज्य शासनाकडून विशिष्ट योजनांसाठी प्राप्त/प्राप्त करण्यायोग्य निधीचा योग्य हिशोब/उपयोग झाला का? विचलन प्रकरणांची यादी करा.

उत्तर : लेखापरीक्षणाखालील वर्षात कंपनीला कोणताही निधी प्राप्त झाला नाही त्यामुळे हा मुद्दा लागू नाही.

प्र.६. करारातील टप्पे आणि खर्च वाढीचा प्रभाव याच्या तुलनेत कामाच्या अंमलबजावणीवर देखरेख ठेवणारी यंत्रणाअस्तित्वात आहे की नाही असेल तर करारामधून मिळालेला महसूल/तोटा इत्यादीचा लेखाजोखापुस्तकात योग्य प्रकारे केला आहे का.?

उत्तर :कंपनीने आपले सर्व कामकाज दीर्घकाळ थांबवले आहे. त्यामुळे असे कोणतेही करार अस्तित्वात नाहीत.

प्र. ७. सार्वजनिक खाजगी भागीदारी अंतर्गत हाती घेण्यात येणा-या प्रकल्पांची ओळख पटविण्यासाठी प्रचलित असलेली प्रणाली सरकारच्या मार्गदर्शक तत्त्वे/धोरणांशी सुसंगत आहे का? विचलन असल्यास टिप्पणी द्या.

उत्तर कंपनीने आपले सर्व कामकाज दीर्घकाळ थांबवले आहे. त्यामुळे वर्षभरात एकही प्रकल्प हाती घेतलेला नाही.

प्र.८. कंपनी कायद्यातील तरतुदी W.R.T. पाळल्या गेल्या की नाही हे तपासा. CSR उपक्रमांचे अहवाल आणि प्रकटीकरण. कॉर्पोरेट गव्हर्नन्स आणि ऑडिट समितीची स्थापना आणि त्यावरील बैठकीचे आयोजन याचा अहवाल

उत्तर : कंपनीने आपले सर्व कामकाज दीर्घकाळ थांबवले आहे. सीएसआरची आवश्यकता नाही कारण कंपनीचे तोटा जमा झाला आहे कंपनीकडे कोणतेही कर्मचारी नाहीत आणि ते कार्यरत नाही. कॉर्पोरेट गव्हर्नन्स किंवा कोणतीही ऑडिट समिती अस्तित्वात नाही.

प्र ९. PSUs कार्यरत आहेत किंवा निष्क्रिय आहे.

उत्तर :PSU दीर्घकाळापासून निष्क्रिय आहे.

कैलाश आणि असोसिएट्स
सनदी लेखापाल
(फर्मची नोंदणी क्रमांक: १०४५० W)
स्वाक्षरीत
सीए. अंकित के. अग्रवाल पार्टनर
(सदस्यत्व क्रमांक: १४१७४२)
युडीन: २५१४१७४२ बीएमआयआय एम एक्स ७०७८
ठिकाण: छ. संभाजीनगर
तारीख: १०/०९/२०२५

परिशिष्ट – ब

मे. मराठवाडा विकास महामंडळ मर्यादित यांच्या दिनांक ३१ मार्च २०२५ अखेर संपलेल्या स्वतंत्र वित्तीय पत्रकाविषयी

लेखा परिक्षकांचा अहवाल

परिशिष्ट

कंपनी कायदा, 2013 चे अंतर्गत उपविभासूची 143 चे उपभाग कलम 1 नुसार अंतर्गत आर्थिक नियंत्रणावर लेखापरिक्षकांचा अहवाल (अधिनियम)

आम्ही मराठवाडा विकास महामंडळ मर्यादित (दि कंपनी) यांचे दिनांक ३१ मार्च २०२५ रोजी संपणा-या वर्षाचे अंतर्गत आर्थिक नियंत्राणावरील आर्थिक अहवालाचे लेखापरिक्षण केले आहे. यासोबत आम्ही कंपनीच्या संपलेल्या आर्थिक वर्षाच्या आर्थिक पत्रकाचे त्याच तारखेला केलेले लेखा परिक्षण आहे.

अंतर्गत आर्थिक विवरणांसाठी व्यवस्थापनाची जबाबदारी:

चार्टर्ड अकाऊंटंट ऑफ इंडिया या संस्थेने जाहीर केलेल्या अंतर्गत आर्थिक नियंत्रणावरील आर्थिक अहवाल यावरील मार्गदर्शक नोंदीनुसार कंपनीच्या व्यवस्थापनाची जबाबदारी आहे की, अंतर्गत आर्थिक नियंत्रणावरील आर्थिक अहवाल तयार करणे व त्यावर देखरेख ठेवणे कंपनी कायदा, 2013 नुसार या जबाबदारीमध्ये संबंधीत लेख्याच्या नस्ती, कायद्याच्या तरतुदीनुसार कंपनीच्या मालमत्तेची सुरक्षा, घोटाळे शोधणे, ते थांबविणे इतर अनियमितता, लेख्याच्या धोरणानुसार योग्य निवड करणे, योग्य न्यायोचित व योग्य आणि किफायतशीर अंदाजे, प्रारुप अंमलबजावणी करणे, अंतर्गत योग्य आर्थिक नियंत्रण करणे, अचुक व पूर्णपणे लेख्याच्या नस्ती प्रभावीपणे हाताळणे, इत्यादी आर्थिक विवरणात घोटाळे किंवा चुकांबाबत सत्य व स्पष्ट माहिती दर्शविणे अंर्तभुत आहे.

लेखा परिक्षकांची जबाबदारी:

आमच्या लेखापरिक्षणाच्या आधारे कंपनीच्या वित्तीय अहवालावरील अंतर्गत आर्थिक नियंत्रणाविषयी मत व्यक्त करण्याची आमची जबाबदारी आहे. दि इन्स्टीटयूट ऑफ चार्टर्ड अकाऊंटंटस ऑफ इंडियाने जारी केलेल्या आकडेवारी वरील अंतर्गत वित्तीय नियंत्रणावरील ऑडीटिंग फायनान्शियल कंट्रोल (मार्गदर्शक टीप) च्या लेखा परिक्षणावरील मार्गदर्शक सुचना आणि कंपनी कायदा 2013 अंतर्गत भाग 143(10) मध्ये परिक्षणाची योग्यता नमुद केलेली आहे. त्यानुसार चार्टर्ड अकाऊंटंटस ऑफ इंडिया या संस्थेने जाहीर केलेल्या अंर्तगत आर्थिक नियंत्रणावरील आर्थिक अहवाल यावरील मार्गदर्शक नोंदीनुसार लेखा परिक्षण करण्यात आले आहे. ज्यात योग्यतेनुसार आवश्यकतेनुसार आम्हास असे सांगणे आवश्यक आहे की, योजना व परिक्षण, अंतर्गत आर्थिक नियंत्रणावरील आर्थिक अहवाल यात चुकीच्या सांगितलेल्या साहित्यापासुन वेगळे आहे. अंतर्गत आर्थिक नियंत्रणावरील आर्थिक अहवाल यामध्ये रकमेबाबत माहिती पुराव्यासह उघड करणे हे लेखा परिक्षणात अंतर्भुत आहे. पध्दतीनुसार निवड करणे हे परिक्षकांच्या मान्यतेवर अवलंबून आहे. आर्थिक विवरणात चुकीच्या सांगितलेल्या साहित्याच्या परिक्षणाची जबाबदारी अंतर्भुत आहे. ज्यात ते घोटाळयानुसार आहे की चुकीचे आहे. परिक्षणाची जबाबदारीमध्ये कंपनीच्या ज्या आर्थिक विवरणात प्रारुप योग्य परिस्थितीत परिक्षणाची पध्दत सत्य व स्पष्ट मत दिले आहे. अशा अंतर्गत परिक्षणाचा विचार करु शकतो. कंपनीच्या अंतर्गत आर्थिक नियंत्रण पध्दतीत आर्थिक माहिती देणे व प्रभावीपणे हाताळणे अशा नियंत्रणाच्या विचारावर मत देणे.

आमच्या लेखा परिक्षणामध्ये वित्तीय अहवाल आणि त्यांचा वापर प्रभावीपणापेक्षा अंतर्गत वित्तीय नियंत्रण प्रणालीच्या पर्याप्ततेबददल लेखा परिक्षण पुरावे मिळविण्यासाठी कार्यपध्दती समाविष्ट आहे. आर्थिक अहवालावरील अंतर्गत वित्तीय नियंत्रणाविषयी आमच्या लेखा परिक्षणामध्ये वित्तीय अहवालावर अंतर्गत आर्थिक नियंत्रणे समजून घेणे, भौतिक दुर्बलता अस्तित्वात असलेल्या जोखमीचे मुल्यांकन करणे आणि मुल्यांकन केलेल्या जोखमीवर आधारीत अंतर्गत नियंत्रणाची रचना व कार्यक्षमता तपासणे व त्याचे मुल्यांकन करणे समाविष्ट आहे. निवडलेल्या कार्यपध्दती फसवणूकीमुळे किंवा त्रुटीमुळे झाली आहे की वित्तीय विवरण पत्राच्या भौतिक गैरवर्तन करण्याच्या जोखमीच्या मुल्याकंनासह लेखा परिक्षकाच्या निर्णयावर अवलंबून असते.

आम्हाला विश्वास आहे की, आम्ही प्राप्त केलेला लेखा परिक्षणाचा पुरावा आर्थिक अहवालाबद्दल कंपनीच्या अंतर्गत वित्तीय नियंत्रण प्रणालीवरील आमच्या लेखा परिक्षणातील मतासाठी आधार प्रदान करण्यासाठी पुरेसा आणि योग्य आहे.

वित्तीय अहवालावरील अंतर्गत वित्तीय नियंत्रणाचा अर्थ:

